# विवाहपूर्व आरोग्य तपासणी



लग्नाचा मुहूर्त गाठण्यासाठी वधू-वराची तयारी सुरू होते आणि त्यात पोशाख, भेटवस्तू, सजावट, निमंत्रण पत्रिका, कार्यालय तसेच आपला लग्नातला लूक, फोटोग्राफी, हनिमून आणि इतर अनेक गोष्टी ठरवायच्या असतात. वधू आणि वर प्रत्येक समारंभासाठी आपले पोशाख, अलंकार, सजावट, मेजवानीचे बेत, विवाहपूर्व फोटो शूट, लग्नानंतर हनिमूनला जायचं स्थळ यावर बरीच रक्कम आणि वेळ खर्च करतात. पण, एक महत्त्वाची गोष्ट मात्र दुर्लक्षित केली जाते, ती म्हणजे दाम्पत्याची विवाहपूर्व आरोग्य तपासणी. लग्न समारंभ काही दिवसांसाठीच असतो, पण लग्नाचं नातं आयुष्यभरासाठी असतं. विवाहपूर्व आरोग्य तपासणी नवदाम्पत्याला आपल्या आरोग्याच्या जेनेटिक, संक्रमित होऊ शकणाऱ्या अथवा संसर्गजन्य रोग अवस्थांविषयी जाणून घेण्यास मदत करते.

एक चांगला विवाहपूर्व आरोग्य तपासणी कार्यक्रम एखाद्या जोडप्याला नि:पक्षपणे त्यांच्या आरोग्याविषयीचा पुरावा आणि माहिती देतो. कुटुंबाची वैद्यकीय पार्श्वभूमी किंवा इतिहास, जेनेटिक्स, वय, आहार आणि व्यसने हे सर्व घटक भविष्याची आखणी करण्यासाठी उपयुक्त ठरतात. विवाहेच्छुक जोडप्याने अशा प्रकारची विवाहपूर्व चाचणी केल्यास, सुप्तावस्थेतील रोग आणि भविष्यात संततीसाठी असणारे धोके याविषयी जाणून घेण्यात त्यांना मदत होते. याशिवाय त्यांना आपली आनुवांशिकता जाणून घेऊन त्यानुसार आवश्यक ती खबरदारी आणि उपचार घेण्यासाठी सहाय्यता मिळते.

आपल्या देशाची आरोग्य अवस्था बघता, पत्रिका जुळवून लग्न ठरवण्यापेक्षाही आरोग्य तपासणी करून ते ठरवण्याची संस्कृती रुजण्याची गरज निर्माण होत आहे. जरी प्रत्येकाने दर वर्षी प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करणे श्रेयस्कर असले, तरी विवाहपूर्व आरोग्य तपासणी लग्नाच्या सहा महिने आधी करून घ्यावी.

## कुठल्या कारणासाठी करावी दाम्पत्याने तपासणी?

**लैंगिक संक्रमणातून होणारे आजार :** एचआयव्ही, हिपेटायटीस बी आणि सी (बी आणि सी प्रकारची कावीळ) या आयुष्यभराच्या अशा आरोग्य अवस्था आहेत की, जर त्या नीट सांभाळल्या गेल्या नाहीत, तर वैवाहिक आयुष्यावर गंभीर परिणाम करणाऱ्या ठरू शकतात. सिफिलिस, गोनोरिया आणि हर्पिस यासाठीही चाचणी करून घ्यायला हवी.

**अनुवंशिक आजार :** रक्ताशी संबंधित आजार जसे हिमोफिलिया,थॅलेसामिया, मारफॅन सिंड्रोम, हन्टिंग्टन डिसीज आणि सिकल सेल अशा काही आजारांचे संक्रमण संततीमध्ये होण्याची शक्यता जास्त असते म्हणून त्याची तपासणी व्हायला हवी.

**प्रजननक्षमता :** हे महत्त्वाचे अशासाठी की, चाचणीतून प्रजनन क्षमतेतील अडचणी लवकरात लवकर शोधून त्याचे निराकरण केले जाऊ शकते, ज्यामुळे वंध्यत्वावरून अनावश्यकरीत्या उद्भवणारे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिक तणाव टाळता येतात.

प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी क्षेत्रातील काही संस्था व्यापक विचार करून डिझाईन केलेल्या आणि अत्यंत उत्तमरीत्या पार पडू शकणाऱ्या विवाहपूर्व आरोग्य तपासण्या देऊ करतात. प्रत्येक जोडप्याने आपल्या लग्नाच्या 'टू डू लिस्ट'मध्ये अशा तपासणीचा समावेश करून घेणे श्रेयस्कर आहे.

**अमोल नायकवडी**